# महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार

**प्रा. डॉ. म. सु. पगारे**
प्रोफेसर व मराठी विभाग प्रमुख,
भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**राजू नामदेव खंडारे**
संशोधक विद्यार्थी
मु. पो. दहिगांव
ता. नांदुरा, जि. बुलढाणा

*ज्योतिरावांच्या शिक्षणाचे उद्दिष्ट हे समता निर्माण करावयाचे होते. शूद्रांना शिक्षण दिले तर मानवी हक्काची जाणीव होईल व ते आपले हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न करतील असे त्यांचे मत होते. त्यांना समाजात बंडखोरी निर्माण करायची नव्हती तर मानवता निर्माण करायची होती. हे फक्त शिक्षणानेच होईल असे त्यांचे ठाम मत होते. इंग्रजांना वाटायचे की, समाजातील वरिष्ठ वर्गाला ज्ञान दिले म्हणजे ते ज्ञान कनिष्ठ वर्गापर्यंत झिरपत जाईल परंतु त्यांचा हा विचार खोटा ठरला. ज्योतिरावांनी शेतकरी, स्त्री, शूद्र यांना त्यांच्या व्यवहारात उपयोगी पडेल असे शिक्षण देण्यावर भर दिला. समाजातील तळागाळातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा प्रस्ताव त्यांनी मांडला. तसेच या मुलांना शिकविण्यास त्यांच्याचमधील शिक्षक निर्माण करावे असे त्यांना वाटत असे.*

प्राचीन समाज रचनेचा विचार केला असता ज्यावेळी निर्मिकाची सेवाभक्ती करण्याचा अधिकार फक्त उच्च वर्गीयांना होता, त्यावेळी इतर समाजव्यवस्था कशी असेल याचा विचार न केलेलाच बरा. काळ तर निघत चाललेला होता पण सामाजिक परिस्थितीत मात्र काडीचाही बदल होत नव्हता. चातुर्वर्णव्यवस्थेवर आधारीत समाजामध्ये इश्वराच्या मर्जी प्राप्ती साठी अनेक प्रकारचे व्रत वैकल्ये केले जात होते. मात्र याच ईश्वराच्या दुबळ्या लेकरांना पशुहूनही खराब जीवन जगण्यास भाग पाडले जात होते. शुद्र-अतिशुद्रांना वाटायचे की एक वेळेस पशुजन्म मिळाला असता तर बरे झाले असते, पण हा शुद्राचा जन्म नको. धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक या सर्वच क्षेत्रात शुद्र-अतिशुद्रांचे शोषण चालू होते. ज्याप्रमाणे गोचीड रक्त प्राशन करुन आपली तुंबडी तुडूंब भरते, त्याच प्रमाणे ब्राह्मण्य विचारसरणीचे लोक त्या काळात शुद्र-अतिशुद्रांचे रक्त पीत होते.

शुद्रांना मंदिरात प्रवेश नाही, इतकेच काय गावात सुद्धा त्यांना प्रवेश नाही. गावाच्या वेशीच्या बाहेर कसेतरी किडे-मुंग्यांप्रमाणे त्यांनी रहावे, गावात भिक्षा मागावी, लाकडे फोडावी, मेलेली जनावरे उचलावी आणि गावातील घाण काढावी. हे सर्व करताना त्यांच्या पायाचे ठसेसुद्धा गावातील जमीनीवर उमटू नये म्हणून त्यांच्या कमरेला खराटा बांधलेला असायचा. थुंकायचे असेल तर गळ्यात मडके असायचे. दगड धोंड्याचा मार सहन करीत जीवन जगणारे हे लोक त्यांची अवस्था वाचून आजही मनाला पीळ पडतो. पेशवाईच्या काळात तर समाजकंटकांचा ऊत आला होता. मनमानी कारभार करुन ते पेशवाईची मर्जी मिळवित होते. या पेशवाईचा अंत होऊन इंग्रजांच्या हाती सत्ता आली. देश परकियांच्या गुलामगिरीत अडकला होता. त्याचा परिणाम देशाच्या कान्याकोपऱ्यात स्वातंत्र्याच्या चळवळी उभ्या राहील्या. अनेक देशभक्तांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहूती दिली. एकीकडे स्वातंत्र्याच्या विचारांची जागृती होत होती तर दुसरीकडे अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, स्त्रियांची दैन्यावस्था अशा रोगांनी समाज ग्रासला होता.

या पार्श्वभूमीवर समाजक्रांतीचे अग्रणी महात्मा ज्योतिबा फुले यांचा उदय झाला. शेकडो वर्षापासून आपल्या शूद्र-अतिशूद्र बांधवांना जो अन्याय सहन करावा लागत होता त्याविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. "बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी" याप्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले यांची कृती नव्हती, तर त्यांनी आपली वाचा, लेखणी आणि कृती याद्वारे अमानवीय विचारांची चिरफाड केली. ब्राह्मण्य विचारसरणीने निर्माण केलेल्या दैववादी विचारसणीमागील सत्य परिस्थिती त्यांनी जगासमोर आणली व आपल्या ग्रंथातून ती मांडली. धर्माचे कर्मकांड निर्माण करुन अंधश्रद्धा, रुढी, परंपरा यांना कसे खतपाणी दिले जाते याचे चित्र आपल्या ग्रंथातून त्यांनी उभे केले. या धर्ममार्तंडांनी, सावकारांनी, पिढ्यान्पिढ्या जे अन्याय, अत्याचार, अमानूष कृत्ये केले ती आपल्या ग्रंथातून मांडून महात्मा ज्योतिबा फुले थांबले नाहीत तर या अवस्थेला कारणीभूत असलेले अज्ञान दूर करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यांच्या मते-

**विद्येविना मती गेली**
**मतीविना नीती गेली**
**नितीविना गती गेली**
**गतीविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले**

अशा प्रकारे एका अविद्येमुळे शूद्र-अतिशूद्र यांची फार वाईट अवस्था झाली. बौद्धिक क्षमता नष्ट होत चालली, प्रगती थांबली, आर्थिक दूर्बलता आली. याचा परिणाम शूद्र खचले व गुलाम बनले. त्यामुळे शूद्र व अतिशूद्र यांना शिक्षण देऊन पिढ्यानपिढ्या चाललेल्या अन्यायाविरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकले.

इंग्रजांच्या येण्याअगोदर अध्यात्मिक शिक्षणावर भर होता. तसेच उच्चवर्णिय व आर्थिक सुबत्ता असलेल्या लोकांनाच फक्त शिक्षणाची कवाडे खुली होती. सर्वसामान्य माणूस, तसेच शूद्र व स्त्रिया हे तर शिक्षणापासून कोसो दूर होते. ही पद्धत इंग्रजांच्या काळानंतर बदलली. आपला राज्य कारभार व्यवस्थीत चालावा या दृष्टीने इंग्रजांनी शिक्षणाची सुरुवात केली. आपली सत्ता चालविण्यासाठी त्यांना नोकरवर्ग हवा होता पण यामूळे शिक्षणाच्या बाबतीत इंग्रजांचा काही विशाल दृष्टीकोण होता असेही म्हणता येणार नाही. उच्चवर्गीयांनी निर्माण केलेली शिक्षण व्यवस्था बदलावी हा सुद्धा त्यांचा उद्देश नव्हता तर त्यांना आपली सोय करुन घ्यायची होती. म्हणून त्यांच्या सोईने त्यांनी शिक्षण व्यवस्था निर्माण केली.

इ.स. १८२७ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म झाला. एका सामान्य माणसाच्या घरात जन्म झाल्यानंतरही त्यांनी अतिशय प्रतिकूल काळात शिक्षण घेतले. घरात शिक्षणाची कोणतीही परंपरा नव्हती. परंतु मूळात हुशार असलेल्या ज्योतिबांनी शिक्षण पूर्ण केले. यामुळे त्यांना जीवनाचे ध्येय मिळाले. शिक्षण घेत असताना तरूणपणात त्यांना जे-जे अनुभव येते होते त्यामधून ते घडत होते. समाजातील तळागाळातील मानवाच्या दुरावस्थेने त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या मनात समाजपरिवर्तनाची आवश्यकता निर्माण होऊ लागली. मानवाला मानवाकडूनच मिळणारी वागणूक पाहून त्यांचे मन गहिवरत होते. शिवाजी महाराज, थॉमस पेन, जॉर्ज वॉशिग्टन यासारख्या थोर विभूतींचा त्यांनी अभ्यास केला. त्यांच्या विचारसरणीमुळे फुलेंना इंग्रजी सत्तेबद्दल घृणा निर्माण होऊन ही सत्ता उलटून टाकावी असे तरुणपणात त्यांना वाटत होते. परंतु राजकीय परिवर्तनापेक्षा समाजातील परिवर्तन होणे त्यांना अधिक आवश्यक वाटले. रंजले गांजले यांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देणे त्यांना महत्त्वाचे वाटले व हा बदल करण्यासाठी आधुनिक विचारांचे इंग्रज हे उपयोगी ठरतील असे त्यांचे मत बनले.

शूद्र-अतिशूद्र, स्त्रिया, शेतकरी यांच्या दूरावस्थेला कारणीभूत असलेल्या अज्ञानरुपी रोगावर शिक्षण हेच औषध आहे हे त्यांनी ओळखले. शिक्षणामुळे शूद्र-अतिशूद्रांची अस्मिता जागृत होईल यावर त्यांचा ठाम विश्वास बसला. शिक्षणाचे सामर्थ्य ओळखून त्यांनी ह्या बहूजनांच्या शिक्षण क्रांतीपर्वाला सुरूवात केली.

"मनूने जाहीर केलेल्या कायद्यांनी स्त्रियांची शिक्षणापासून पूढील काळात फारकत झाली."[१] ज्या देशात स्त्रियांना देवतेचे पुजनीय स्थान आहे त्या देशात स्त्रियांना गुलाम बनविण्यात आले. याला मनूसारख्यांनी निर्माण केलेली विचारसरणी कारणीभूत ठरली. स्त्रिया म्हणजे पापाची खाण आहे, त्यांच्या सहवासाने पुरुष भ्रष्ट होतो, स्त्रियांच्या ठिकाणी अनेक दुर्गुण असतात, त्यांना वेदाध्ययनाचा अधिकार नाही अशा अफवांनी स्त्री ला फार हाल अपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. ही परिस्थिती ज्योतिबांच्या नजरेतून सुटली नव्हती आणि म्हणूनच जर समाजाला बदलवायचे असेल, विचारांचे परिवर्तन करायचे असेल तर कुटुंबातील अतिशय महत्त्वाचा घटक तो म्हणजे `स्त्री` यांच्या विचारामध्ये व स्थितीमध्ये बदल होणे आवश्यक आहे. हे मर्म जाणून त्यांनी अपल्या शिक्षणाच्या कार्याचा आरंभ इ.स. १८४८ मध्ये पुणे येथे मुलींची पहिली शाळा सुरु करुन केला.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपले मित्र सदाशिवराव गोवंडे यांना सोबत घेऊन नगरमध्ये अमेरिकन मिशन मधील मिस फरार यांनी काढलेल्या मुलींच्या शाळा पाहील्या आणि त्यामुळेच त्यांनी या कार्याला हात घातला. या शाळेत सावित्रीबाई फुले यांना शिक्षिका बनविले. सहाजीकच या सर्व गोष्टींमुळे सनातन्यांचा अंगाचा तिळपापड झाला. ``विद्या शूद्राघरी चालली.``

म्हणून त्यांनी बोंबाबोंब केली. परंतु फुलेंनी न डगमगता, मनूने स्त्रियांच्या पायात टाकलेल्या सामाजिक बंधनाच्या बेड्या तोडून टाकल्या.

ज्योतिबांना व सावित्रीबाईंना दगड धोंड्याचा मार खावा लागला. परंतु ते मागे सरले नाहीत. याचवेळी गोविंदरावांनी ज्योतिबांना घरातून बाहेर काढले. आतामात्र ज्योतिबांच्या समोर मुलींच्या शिक्षणाचा मोठा पेच निर्माण झाला होता. परंतु आपल्या मित्राच्या सहाय्याने ज्योतिबांनी त्यांचे शैक्षणिक कार्य पूढेही चालू ठेवले. सावित्रीबाई फुले हे शिक्षिकेप्रमाणे मुलींच्या आईही झाल्या. आता शाळेतील मुलींची संख्या वाढू लागली होती. त्यामुळे पुन्हा जागेचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा, `ज्योतिरावांचे क्रांतीकार्य एका मुसलमान गृहस्थाला भिडले व त्याने आपली मोठी जागा शाळेस दिली.`[२] जुलै १८५१ मध्ये बुधवारपेठेत शाळा सुरु झाली.

शाळेत सावित्रीबाई फुले शिकवीत होत्या. ते त्यांचे कार्य विनावेतन करीत होत्या. परंतु इतर शिक्षक मात्र कमी वेतनात काम करायचे, म्हणजे विचार करीत असत. त्यांना मोठ्या वेतनाच्या नोकऱ्या हव्या होत्या. कार्यकारी मंडळाची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे या शिक्षकांना मोठे वेतन देता येत नव्हते. येणाऱ्या प्रत्येक अडचणीवर मात करत ज्योतिबा आपले कार्य करीत होते. शाळेत गणित, व्याकरण, इतिहास , भूगोल या विषयाबरोबरच वाचन, लेखनास सुरुवात झाली. ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी विद्यार्थ्यांची चांगली प्रगती केली. ही प्रगती पाहून शिक्षण खात्याचे मेजर कँडी यांनीसुद्धा त्यांची प्रशंसा केली.

शिक्षणामुळे केवळ वाचन, लिहिता येणे एवढेच ध्येय त्यांचे नव्हते तर त्यांना जागरुक नागरिक निर्माण करायचा होता. म्हणून त्यांनी शिक्षणाला पूरक असणाऱ्या गोष्टींनासुद्धा चालना दिली. दक्षिणा फंडात शिल्लक असलेली रक्कम इतरत्र वायफळ खर्चापेक्षा मराठीतील नव्या, स्वतंत्र भाषांतरात्मक पुस्तकासाठी ती खर्च करावी अशा प्रकारच्या विचारांना त्यांनी पाठिंबा दिला. `शिक्षण हे सामान्यांच्या मातृभाषेतून दिले जावे या शिक्षणाच्या मुलभूत सिद्धांतास ज्योतिराव या प्रसंगाच्या निमित्ताने उचलून धरीत होते.`[३] ज्योतिरावांच्या शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हे अतिशय गरीब असल्यामुळे वर्तमानपत्रसुद्धा विकत घेऊ शकत नाही याची जाणीव त्यांना होती. म्हणून विविध विषयाचे ज्ञान व्हावे व वाचनासाठी त्यांनी वाचनालय काढले. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला.

इंग्रजांनी त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांना गौरवान्वित केले. १६ डिसेंबर १८५२ रोजी त्यांना एका समारंभात शालजोडी अर्पण करुन सन्मानीत करण्यात आले. १९ व्या शतकातील भारतातील शैक्षणिक इतिहास काही व्यक्तींच्या नावाशी निगडीत झाला आहे असे सर हेन्री शार्प यांनी यथार्थपणे म्हटले आहे. ज्योतिराव फुले हे त्यापैकी एक होते. `स्त्रियांचा उद्धारकर्ता` म्हणून ते आता ओळखले जात होते.

इंग्रजांनी जरी ज्योतिरावांचा सत्कार केला असला तरी `फोडा व झोडा` ही त्यांची निती होती. ते भेदभावास चालना देणारे व सामान्य माणसाकडे दूर्लक्ष करणारे होते. या नितीनुसारच त्यांनी पुण्यातील महाविद्यालये, जे फक्त ब्राह्मण मुलांसाठीच होते ते सर्व हिंदूंना प्रवेशास खुले केले. ब्राह्मणांना ही गोष्ट रुजणारी नव्हती त्यामूळे पुन्हा त्यांनी आगपाखड सुरु केली. परंतु पुढे प्रसारमाध्यम व जनतेपुढे त्यांना माघार घ्यावी लागली.

ज्योतिरावांच्या शिक्षणाचे उद्दिष्ट हे समता निर्माण करावयाचे होते. शूद्रांना शिक्षण दिले तर मानवी हक्काची जाणीव होईल व ते आपले हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न करतील असे त्यांचे मत होते. त्यांना समाजात बंडखोरी निर्माण करायची नव्हती तर मानवात मानवता निर्माण करायची होती. हे फक्त शिक्षणानेच होईल असे त्यांचे मत होते. कुटुंब ही मुलांची पहिली शाळा असते म्हणून त्यांनी या महान कार्याची सुरुवात स्त्री शिक्षणापासून केली. इंग्रजांना वाटायचे की, समाजातील वरिष्ठ वर्गाला ज्ञान दिले म्हणजे ते ज्ञान कनिष्ठ वर्गापर्यंत झिरपत जाईल परंतु त्यांचा हा विचार खोटा ठरला. ज्योतिरावांनी शेतकरी, स्त्री, शूद्र यांना त्यांच्या व्यवहारात उपयोगी पडेल असे शिक्षण देण्यावर भर दिला. समाजातील तळागाळातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तिचे करावे असा प्रस्ताव मांडला. तसेच या मुलांना शिकविण्यास त्यांच्याचमधील शिक्षक निर्माण करावे असे त्यांना वाटत असे. कुणीही शिक्षणापासून वंचीत राहू नये म्हणून बोर्डींग निर्माण कराव्या असा विचार त्यांनी मांडला.

इ.स. १८८२ मध्ये शिक्षणासंदर्भात जे हंटर कमिशन नेमले त्यांच्या सभेपुढेही त्यांनी शूद्रांना शिक्षण सक्तिचे करण्याबाबत कायदा करावा अशा प्रकारचा विचार त्यांनी मांडला. इ.स. १८८८ मध्ये आलेल्या ड्यूक या अधिकाऱ्यासमोर

त्यांनी निर्धन, दरिद्री, शूद्र, शेतकरी यांच्या प्रतिनिधित्व करताना या शूद्र शेतकऱ्यांच्या पेहेरावासारखा पेहेराव करुन सत्य परिस्थिती सर्वांच्या समोर आणली आणि शिक्षणाची गरज पटवून सांगितली. उच्च वर्णियांना उच्च शिक्षण देण्यापेक्षा बहुजनांना प्राथमिक शिक्षण देणे हे अत्यावशक आहे यावर त्यांचा भर होता. ज्ञान ही शक्ती आहे, त्यांना ज्ञानाचे महत्व पटले होते म्हणूनच त्यांनी, ``सरकारने बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या प्रयत्नांना अग्रक्रम दिला पाहीजे``[४] असा आग्रह धरला होता. शिक्षणाद्वारे समाजात परिवर्तन व्हायला पाहिजे. न्याय, समता व स्वातंत्र्य यांचा विकास समाजात होऊन मानवाने मानवाशी प्रेमाने वागावे अशी मानवाच्या कल्याणाची त्यांची इच्छा होती. महात्मा ज्योतिबा फुले हे मानवातावदी होते म्हणून मानव सुखी कसा होईल? याचाच ते विचार करीत होते.

सामाजिक कार्यात ज्योतिबांची भिस्त प्रामुख्याने लोकशिक्षणावर होती. राज्यकर्त्यांनी जर मनात ठरविले तर ते अस्पृश्यांना शिक्षणाचे कवाडे उघडी करुन त्यांच्या विकासाचे काम अगदी सहजपणे करु शकतात असा त्यांचा विश्वास होता. अस्पृश्यांच्या मुलाचे मन शाळेमध्ये शिक्षणासाठी रमेल हे काम करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची आहे असे त्यांना वाटत असे. परंतु, राज्यकर्तेच याबाबत उदासीन असल्याची खंत त्यांच्या मनात होती. ``शिक्षणात अशा सुधारणा पाहिजे की ज्याने वरिष्ठ वर्गातील निती व बुद्धिमंत्ता यांची पातळी उंच होईल``[५] इस्ट इंडीया संचालकांनी केलेले हे विधान तेव्हाच खरे होऊ शकते जेव्हा वरिष्ठ वर्गामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता, शिक्षण या विषयी अनुकूल मत निर्माण होईल. अशा प्रकारे महत्मा फुले यांनी बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना सन्मानाने जगण्याची दिशा दिली. सर्व मानव ही एकाच ईश्वराची लेकरे असून सर्वांना आपला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास करुन घेण्याचा सारखा अधिकार आहे. ही सत्याची जाणीव समाजाला करुन दिली. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावरुन आपल्याला त्यांच्या शैक्षणिक विचारांची ओळख होते.

**संदर्भ ग्रंथ**

१. ठोंबरे तानाजी, महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य, पृ. ११, लोक वाड्मय, गृह प्रकाशन, मुंबई-१, मे, २००१.
२. तत्रैव, पृ. १५
३. तत्रैव, पृ. १७
४. सेंदाणे आत्माराम, ज्योतिबांचा विचार वणवा, पृ. ५६, सुगावा प्रकाशन, पुणे, १ मे २०१२.
५. कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पृ. ६६, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२